ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचा प्राधान्यक्रम निश्चित करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन निर्णय क्र.ग्रापापु-१००५/प्र.क्र.१५६/पापु-०७**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२. दिनांक २९ नोव्हेंबर, २००५**

**वाचा :** शासन शुध्दीपत्रक, पा.पु.व स्व.वि., क्र.ग्रापापु-१००४/प्र.क्र.२४४/पापु-०७,
दि. ८ फेब्रुवारी, २००५.

**प्रस्तावना :**

शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु- १००२ /प्र.क्र.५३२ / पापु-०७, दि. २३ मार्च, २००२ अन्वये नव्या मागणी आधारित समुह सहभागाच्या ग्रामीण पाणी पुरवठा योजनेच्या धोरणांतर्गत पाणी पुरवठा योजनेची / सुविधेची मागणी ग्राम पंचायती / गावांकडून प्राप्त झाल्यावर या गावांच्या निवडीचा प्राधान्यक्रम ठरविण्यासाठीची १०० गुणांची निकष यादी संदर्भाधिन दि. ८ फेब्रुवारी, २००५ च्या शासन शुध्दीपत्रकान्वये सुधारित करण्यात आलेली आहे.

२. या सुधारित निकष यादीनुसार गावांची निवड करण्यासंदर्भात क्षेत्रीय अधिकाऱ्यांकडून माहिती घेता असे निदर्शनास आले आहे की, या १०० गुणांच्या निकषांमधून पाणी पुरवठा, टंचाई व पाणी गुणवत्ता या तीन निकषांना मिळून निर्णयार्थ कमी गुण आहेत. तर, इतर निकषांना अधिक गुण आहेत. त्यामुळे, ज्या गावांना निकषांपेक्षा कमी पाणी पुरवठा होतो किंवा शुध्द पाणी मिळत नाही अशा गावांची निवड कमी प्रमाणात होते. त्यामुळे, या योजनेचा उद्देश पूर्णतः सफल होत नाही असे दिसून आले आहे. यास्तव सदर १०० गुणांच्या निकषामध्ये बदल करुन पाणी पुरवठा, टंचाई व पाणी गुणवत्ता या निकषांना अधिक प्राधान्य देऊन जास्तीत जास्त गुण या निकषांना देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :**

प्रस्तावनेत नमूद केलेल्या बाबींचा विचार करुन संदर्भाधिन ग्रामीण पाणी पुरवठा योजनेसाठी गाव निवडीकरीता **संदर्भाधिन दि. ८ फेब्रुवारी, २००५ च्या शुध्दीपत्रकासोबत दिलेले सुधारित निकष रद्द करुन, ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध प्रकल्पांसाठी ( जलस्वराज्य, स्वजलधारा, महाजल, आपले पाणी) गाव निवडीचे निकष पुढीलप्रमाणे ठरवून देण्यात येत आहेत:-**

| अ.क्र | निकष | कमाल गुण | गुणांकन पध्दत | द्यावयाचे गुण |
|---|---|---|---|---|
| १. | **पाणी पुरवठा** | ७५ | | |
| | (अ)लाभधारकांना होणारे पाणी पुरवठयाचे सध्याचे प्रमाण. | ६० गुण | १) गावात शासकीय पाणी पुरवठा योजना नाही. **(CAP-99 प्रमाणे व सन २००३ च्या सर्वेक्षणा प्रमाणे NC गावे / वाडया)** | ६० गुण |
| | | | **अथवा** | |
| | | | १) **गावातील पिण्याच्या पाण्याचे सर्व** स्त्रोत फ्लोराईड, आर्सेनिक, नायट्रेट, शिसा, मचुळपणा, इतर हानिकारक खनिज किंवा आरोग्यास धोकादायक बाबी यांनी बाधित आहेत. **(NSS) ( Not Safe Source)** | ६० गुण |
| | | | २) गावात असलेल्या शासकीय पाणी पुरवठा योजनेतून होणाऱ्या **शुध्द पाणी*** पुरवठयाचे प्रमाण: (PC) | |
| | | | अ) ० - १० लिटर | ५५ गुण |
| | | | ब) ११ - २० लिटर | ४५ गुण |
| | | | क) २१ - ३० लिटर | ३५ गुण |
| | | | ड) ३१ लिटर अथवा त्यापेक्षा जास्त परंतु ४० लिटरपेक्षा कमी | २५ गुण |
| | | | इ) ४० लिटर व त्याचे वर | ० गुण |
| | **(ब)** पाणी टंचाई असल्याने टँकर लावावी लागणारी गांवे | **१५ गुण** | १) **सतत ५ वर्षे** किंवा त्यापेक्षा जास्त वर्षे टँकरव्दारे पाणी पुरवठा केला असल्यास (किमान ३० सलग दिवस प्रत्येक वर्षी ) | १५ गुण |
| | | | २) **सतत २ वर्षा** पेक्षा जास्त पण ५ वर्षापर्यंत टँकरव्दारे पाणी पुरवठा केला असल्यास (किमान ३० सलग दिवस प्रत्येक वर्षी ) | १० गुण |
| | | | ३) **सतत २ वर्षे** टँकरव्दारे पाणी पुरवठा केला असल्यास (किमान ३० सलग दिवस प्रत्येक वर्षी ) | ५ गुण गुण |

| अ.क्र. | निकष | कमाल गुण | गुणांकन पध्दत | द्यावयाचे गुण |
|---|---|---|---|---|
| २. | मागासवर्गीयांचे प्रमाण (लोकसंख्येशी टक्केवारी) | ५ गुण | १) जिल्हा सरासरीएवढी टक्केवारी<br>२) जिल्हा सरासरीपेक्षा जादा टक्केवारीसाठी प्रत्येक पूर्ण टक्क्याला १ गुण. मात्र, कमाल गुण मर्यादा जिल्हा सरासरीपेक्षा ४ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास कमाल ५ गुणांवर सिमित करावे.<br>३) जिल्हा सरासरीपेक्षा कमी टक्केवारी असल्यास ० गुण देण्यात यावे. | १ गुण<br>२ ते कमाल ०५ गुण<br>० गुण |
| ३. | आदिवासींचे प्रमाण (लोकसंख्येशी टक्केवारी ) | ५ गुण | १) जिल्हा सरासरीएवढी टक्केवारी<br>२) जिल्हा सरासरीपेक्षा जादा टक्केवारीसाठी प्रत्येक पूर्ण टक्क्याला १ गुण. मात्र, कमाल गुण मर्यादा जिल्हा सरासरीपेक्षा ४ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त असल्यास कमाल ५ गुणांवर सिमित करावे.<br>३) जिल्हा सरासरीपेक्षा कमी टक्केवारी असल्यास ० गुण देण्यात यावे. | १ गुण<br>२ ते कमाल ५ गुण<br>० गुण |
| ४. | गावातील पूर्वीची पाणीपट्टी वसुली (शासनाने ठरविलेल्या किमान दराने अथवा त्यापेक्षा जास्त दराने पाणीपट्टी आकारली असली तरच सदर गुण प्राप्त होतील नाहीतर शुन्य गुण प्राप्त होतील.) | ५ गुण | १) ८० ते १०० टक्के वसुली<br>२) ५० ते ७९ टक्के वसुली<br>३) ५० टक्के पेक्षा कमी वसुली | ५ गुण<br>३ गुण<br>१ गुण |
| ५. | संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियानाअंतर्गत बक्षीस मिळाले असल्यास. | १० गुण | १) विभाग किंवा राज्य स्तरावरील बक्षिस मिळाले असल्यास.<br>२) जिल्हा स्तरावरील बक्षीस मिळाले असल्यास<br>३) पंचायत समिती स्तरावरील बक्षीस मिळाले असल्यास<br>४) जिल्हा परिषद मतदार संघ स्तरावरील प्रथम तीन पैकी क्रमांक मिळाला असल्यास.<br>५) कोणतेही बक्षीस नाही. | १० गुण<br>७ गुण<br>४ गुण<br>२ गुण<br>० गुण |

टिप : **शुध्द पाणी** म्हणजे माणसाला रासायनिक प्रदुषण मुक्त पिण्यायोग्य असलेले पाणी होय. (पिण्याच्या पाण्याचा स्त्रोत फ्लोराईड, आर्सेनिक, नायट्रेट, शिसा, मचुळपणा, इतर हानिकारक खनिज किंवा आरोग्यास धोकादायक बाबी यांनी बाधित नसावा)

२. ग्रामीण पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत गावांची निवड वरील निकषानुसार करुन योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी. हे आदेश तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

संजीव कुमार
(संजीव कुमार) २१/११/०५
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्री यांचे सचिव
३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव
४. मा. मंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
५. मा. राज्यमंत्री (सर्व) यांचे खाजगी सचिव
६. मा. अध्यक्ष , जिल्हा परिषद, (सर्व)
७. मा. मुख्य सचिव
८. विभागीय आयुक्त (सर्व)
९. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
१०. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
११. जिल्हाधिकारी (सर्व)
१२. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, (सर्व)
१३. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१४. प्रादेशिक मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१५. उपसंचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
१६. अधिक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१७. तहसीलदार (सर्व)
१८. जिल्हा वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा (सर्व)
१९. जिल्हा माहिती अधिकारी (सर्व)
२०. कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
२१. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
२२. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद, (सर्व)
२३. गट विकास अधिकारी, पंचायत समिती (सर्व)
२४. महालेखापाल, महाराष्ट्र-१, (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
२५. महालेखापाल, महाराष्ट्र-२, (लेखा परिक्षा)/(लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
२६. मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
२७. उप मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती व नागपूर
२८. नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
२९. मंत्रालयातील इतर सर्व विभाग
३०. पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व पर्यवेक्षकीय अधिकारी व कार्यासने
३१. निवडनस्ती (पापु-०७), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग